| MHKO190009142022 | निशाणी क्र.१२ खालील आदेश<br>नियमित दिवाणी दावा क्र.३१५/२०२२<br>*Radhabai Krishnaji Gunjan etc.3Vs. Rakesh Ramesh Bhogate etc.4*<br>(दिनांकः०७/११/२०२३) |
|---|---|

१. वादीं यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादीं यांचेतर्फे सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल करण्यात आले व सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

३. वादीं व प्रतिवादीं तर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

४. वादीं तर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा दावा वादीं यांनी कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. परंतु सदर दावा नि.क्र.१ मध्ये व नि.क्र.५ च्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र.१ चे नाव ' राकेश' असे नजरचुकीने नमुद झालेले आहे. परंतु प्रतिवादी क्र.१ यांचे नाव 'पंढरीनाथ' असे आहे. सदरची बाब बेलीफ यांचे मार्फत सादर केलेल्या समन्स अहवालावरुन वादीं यांच्या निदर्शनास आली. सदरची दुरूस्ती ही न्यायाचे दृष्टीने अगत्याची आहे. त्यामुळे वादीं त्याबाबत दाव्यात दुरूस्ती करु इच्छीतात. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप व कारण यामध्ये कोणताही बदल होणार नाही अथवा प्रतिवादींचे नुकसान होणार नाही. याउलट दुरुस्ती नामंजूर झालेस वादींचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली.

५. याउलट प्रतिवादीं तर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, वादीं यांनी जाणुन बुजून चुकीच्या नावाने प्रतिवादीं विरुध्द सदरचा दावा दाखल केला आहे. वादीं यांना प्रतिवादीं यांच्या नावाची संपूर्ण कल्पना होती. त्यामुळे वादींनी दिलेला अर्ज चालणेस पात्र नाही. सबब,

त्यांनी अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

६. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले. वादींनी प्रस्तुतचा दावा कायम मनाई मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, प्रस्तुत दाव्यामध्ये व नि.क्र.५ च्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र.१ यांचे नाव 'राकेश' असे नमुद करण्यात आले आहे. प्रतिवादी क्र.१ यास दाव्याचे समन्स व नि.क्र.५ ची नोटीस पाठविण्यात आली. समन्सचा अहवाल नि.क्र.६ संबंधीत बेलीफ मार्फत दाव्यात सादर करण्यात आला. सदर अहवालाची पाहणी केली असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे नाव 'राकेश' नसुन 'पंढरीनाथ' असे आहे हे कारण सांगून समन्स स्विकारणेस नकार दिलेला आहे. यावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ याचे नाव 'राकेश' नसुन 'पंढरीनाथ' असे आहे. प्रस्तुतचा दावा कायम मनाईसाठी दाखल केला असल्यामुळे दावा मिळकतीमधील प्रतिवादींची नावे अचुकपणे दाव्यामध्ये नमुद असणे आवश्यक आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दुरुस्ती अर्ज मंजूर केलेस सदर दाव्याचा गुणावगुणांवर अंतिम निर्णय देणेस मदतच होणार आहे. प्रस्तावित दुरूस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरुपात अथवा दाव्याच्या कारणांमध्ये कोणताही बदल होत नाही. सबब, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. परिणामी, मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**– आदेश –**

१. प्रस्तुत दुरूस्ती अर्ज निशाणी क्र.१२ मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीं यांनी दाव्यामध्ये आवश्यक ती दुरूस्ती करुन दुरस्त दाव्याच्या प्रती पुढील तारखे पर्यंत अभिलेखावर दाखल कराव्यात.

Sd/-

**(डि.एम.जी.मलिदवाले )**

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

राधानगरी

ठिकाण : राधानगरी

दिनांक:०७/११/२०२३